MHSO110013782026

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०६/२०२६**

सुरज कदम वि. महाराष्ट्र शासन

## निशाणी क्र. ०१ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, अर्जदाराच्या मालकीची RN CABINET & PRO AUDIO या कंपनीचे दोन PLAZMA BEC 21 INCHI व दोन TOP 5 FUT 4 MID 12HF हे अकलुज पोलीस स्टेशन यांनी गु.र. क्र. ७३/२०२६, भा. न्या. सं. चे कलम २२३, ३(५), ध्वनी प्रदुषण नियम २००० चे कलम ३, ४, ८ व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम १५ प्रमाणे गुन्हयामध्ये जप्त केली आहे. वर नमुद वाहन मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदर कामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि तपासिक अंमलदार यांचे म्हणणे मागविण्यात आले.

४. तपासिक अंमलदार आणि सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर वाहन अर्जदारास परत करणेबाबत हरकत घेतली आहे.

५. अर्जदाराने अर्जासोबत आधारकार्ड, प्रथम खबर अहवाल, टॅक्स इनव्हाईस प्रमाणित प्रत तसेच इतर कागदपत्र दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्रांवरुन सदरचे साउंड अर्जदार यांच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. टॅक्स इनव्हाईस प्रमाणित प्रतीवरील नोंदीप्रमाणे साऊंड अर्जदाराचे असल्याचे दिसून येत आहे.

६. अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराने वर नमुद साऊंड त्यांना दैनंदिन वापरासाठी उपयोग होत असल्याचे सांगितले आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी

साऊंड परत करणेबाबत हरकत घेतली असली तरी, अर्जदार हे सदर साऊंड सिस्टीम प्रथमदर्शनी नोंदणीकृत मालक असल्याने ते जप्त साऊंड अंतरिम ताबा मिळण्यास हक्कदार आहेत. त्यांना त्याचा ताबा न दिल्यास व ते तसेच पोलीस ठाणे येथे पडून राहिल्यास त्याचे नुकसान होणार आहे. सबब, सदरचे साऊंड सिस्टीम अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात शर्ती व अटींवर देणे योग्य होणार आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | निरीक्षक, अकलुज पोलीस स्टेशन, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी ७३/२०२६, RN CABINET & PRO AUDIO या कंपनीचे दोन PLAZMA BEC 21 INCHI व दोन TOP 5 FUT 4 MID 12HF साऊंड सिस्टीम हे अर्जदार सुरज राजेंद्र कदम, रा. अकलुज, शिवाजी चौक, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांना त्यांनी रक्कम रुपये ३,००,०००/– चा सुपूर्तनामा पोलीस स्टेशन येथे सादर केल्यानंतर व त्यात खालील अटी नमूद केल्यानंतर अर्जदाराचे ताब्यात देण्यात यावे. |
| अ. | अर्जदाराने मूळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत साऊंड सिस्टीम मूळ स्वरूपात कोणताही बदल करू नये. |
| ब. | अर्जदाराने मूळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत प्रस्तुत साऊंड सिस्टीममध्ये त्रयस्थ इसमाचा हितसंबंध कोणत्याही प्रकारे निर्माण करु नये. |
| क. | अर्जदाराने न्यायालय आदेश करेल त्यावेळेस प्रस्तुतचे साऊंड सिस्टीम न्यायालयासमोर हजर करावे. |
| ३. | निरीक्षक, अकलुज पोलीस स्टेशन, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांना असेही आदेशित करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुतचे साऊंड सिस्टीम अर्जदारास परत करण्यापूर्वी त्याचा मुळ साऊंड सिस्टीम नमूद करून प्रस्तुत साऊंडचे यथोचित पंचनामा करावा. तसेच त्यांनी साऊंड सिस्टीमचे प्रत्येक बाजूने छायाचित्रे घ्यावीत. सदर पंचनामा व छायाचित्रे त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात येत असल्यास त्यासोबत जोडावी. |

| | |
|---|---|
| ५. | प्रस्तुतचे प्रकरण दोषारोपत्र पत्र दाखल झालेस त्यासोबत ठेवण्यात यावे. |

(न्यायासनावर निवेदीत आणि अधिघोषीत.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.07.16 16:23:56 +0530

दिनांकः– १६.०७.२०२६

(गुलफराज एम. बिरादार)
३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
माळशिरस